# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 4754/शि.वि./२०१५
दि.24/०८/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :-** शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व शाळांमध्ये मुलां-मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करणेबाबत.

**संदर्भ :-** मा. राज्य प्रकल्प संचालक यांचे प्रत्र क्र. मप्राशिप/सशिअ/बांध ९११/२०१५-१६/२२५९ दि. २०ऑगष्ट २०१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. प्रधानमंत्री यांनी दि. १५ ऑगष्ट २०१५ रोजी स्वातंत्र दिनाच्या भाषणामध्ये सर्व शासकीय शाळांमध्ये मुलां-मलींकरीता स्वंतत्र वापरण्यायोग्य स्वच्छतागृहे पुढील स्वांतत्र दिनाच्या दिवशी उपलब्ध करण्याची घोषणा केली आहे. याकरीता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हयाच्या आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहे मंजुर करण्यात आली आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार शाळांना मुलभूत सुविधा उपलब्ध करणे व त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक प्राधीकरणाची आहे. शाळेतील स्वच्छतागृह वापरण्यायोग्य राहण्याच्या दृष्टीने स्वच्छतागृहामध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात यावी. ज्या स्वच्छतागृहामध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. अश्या ठिकाणी स्वच्छतागृहाच्या बाहेर पाण्याची टाकी ठेवण्यात यावी व स्वच्छतागृहामध्ये पाण्यासाठी बादली व पात्र (भांडे) ठेवावी. तसेच बालकांना स्वच्छतागृहाच्या योग्य वापराबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात यावे. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याची सोय स्वच्छतागृहापासून दूर करावी.

ज्या शाळेत मुलां-मलींकरीता स्वंतत्र वापरण्यायोग्य स्वच्छतागृहे नाहीत त्यांनी आपल्या झोनच्या सहा. आयुक्त व सर्व शिक्षा अभियान यांच्या सहकार्याने स्वच्छतागृहे बांधून घ्यावीत व त्यांच्या स्वच्छतेबाबत दक्षता बाळगावी.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT